| | |
|---|---|
| MHJN040024362023 | फौ. कि. अर्ज क्र. ३५९/२०२३<br>सूरेखा + १ वि. सुरेश |

## निशाणी क्र.१३ वरील आदेश

(पारीत दिनांक १५ जून २०२४)

सदरचा अर्ज हा अंतरिम अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

१. प्रस्तूत अर्जाव्दारे अर्जदार क्र.१ असे कथन करते की, ती गैरअर्जदार याची कायदेशीर पत्नी असून अर्जदार क्र.२ हा गैरअर्जदार यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांचा विवाह दि.०४.०३.२०२० रोजी हिंदू धर्म रितीरिवाजानुसार मौजे पानेगाव, ता. अंबड, जि. जालना येथे संपन्न झालेला आहे. सदर विवाहसंबंधातून अर्जदार क्र.१ गैरअर्जदार यांना एक मुलगा झालेला आहे. लग्नानंतर गैरअर्जदारांनी तिच्याकडे ५०,०००/– रूपयांची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला व ती गरोदर असतांना तिला घरातून हाकलून दिले. तेव्हापासून ती माहेरी तिच्या मुलासह राहत आहे. ती पूढे असे कथन करते की, तेव्हापासून गैरअर्जदार क्र.१ याने तिची व तिच्या मुलांची पालनपोषणाची जबाबदारी असतांना त्याने हेतूपरस्पर त्याची हेळसांड केलेली आहे. ती असे कथन करते की, ती स्वत:चे व तीच्या मुलाचे पालन पोषण करण्यास समर्थ नाही व तिच्याकडे कूठल्याही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा सधन असून तो जालना येथील खाजगी कंपनीत नोकरी करतो व त्यास महिण्याकाठी ३०,०००/– ते ४०,०००/– रूपये इतके उत्पन्न प्राप्त होते तसेच, त्याची गावाकडे शेती असून त्यातून देखील त्यास वार्षीक उत्पन्न प्राप्त होते. ती असे कथन करते की, अर्जदार क्र.२ हा सतत आजारी पडतो व त्याच्याकरीता देखील औषधोपचारांची व्यवस्था करावी लागते त्यामुळे ती गैरअर्जदार क्र.१ कडून अर्जदार क्र.१ हिला ६,०००/– रूपये दरमहा व अर्जदार

क्र.२ याला ४,०००/– रूपये दरमहा अंतरिम पोटगीचा आदेश प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यंत लागण्याची प्रार्थना करते.

२. गैरअर्जदारांनी निशाणी क्र.८ वर त्यांचा लेखी जवाब व म्हणणे सादर करून सदर अर्जाला विरोध दर्शवला. त्याने असे कथन केले की, लग्नानंतर अर्जदार ही वारंवार माहेरी जाणे, घरात भांडणतंटा करणे, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणे इत्यादी कृत्य करत राहिली. त्यानंतर सन २०२१ पासून ती काही कारण नसतांना माहेरी राहत आहे. तो पूढे असे कथन करतो की, अर्जदाराने त्याची सम्मती न घेता गर्भपात करून घेतला. तो पूढे असे कथन करतो की, ती गेल्या तीन वर्षांपासून म्हणजेच जवळपास लग्न झाल्यापासून त्याच्यासोबत नांदत नाही व त्याच्यावर व त्याच्या कूटूंबियांवर भा.द.वि.कलम ४९८–अ नूसार तक्रार दाखल केलेली आहे. तो पूढे असे कथन करतो की, त्याने दि.२१.०६.२०२३ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे नांदायला येण्याबाबत नोटीस पाठविली परंतु, तिने सदर नोटीस स्विकारण्यास नकार दिला. तो पूढे असे कथन करतो की, त्याला कूठलाही कामधंदा मिळत नाही व त्याला त्याचया वयोवृध्द आईवडीलांचा सांभाळ करावा लागतो तसेच, त्याच्याकडे उत्पन्नाचे कूठलेही साधन नाही. शिवाय अर्जदार ही शिलाई मशिनचे काम करून दररोज ५००/– ते ६००/– रूपये कमवते त्यामुळे सदरहू अर्ज फेटाळण्याची प्रार्थना तो करतो.

३. दोन्ही कथनांचा विचार करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र | **मुद्दे** | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र.१ ही सिध्द करते काय की, गैरअर्जदार हा पूरेसे साधन असतांना देखील स्वत:चे पालन पोषण करण्यास समर्थ नसणा–या अर्जदारांचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे ? | होय |
| २ | अर्जदार क्र.१ ही सिध्द करते काय, की अर्जात मागीतललेली मागणी मिळण्यास ती पात्रआहे ? | अंशत: होय |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता:</u>**

४. अर्जाचे व त्यावरील उत्तराचे अवलोकन केले, अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ हा त्याचा मुलगा असल्याची बाब गैरअर्जदाराला मान्य आहे. नि.क्र.१२ वरील अर्जदाराचे तसेच, नि.क्र.१५ वरील गैरअर्जदाराच्या मालमत्ता व दायित्व यांच्या शपथपत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार ही तिचे व तिच्या मुलाचे पालनपोषण करण्यास समर्थ नाही व तिला तिच्या व तिच्या मुलाच्या दैनंदिन गरजासाठी खर्च करावा लागतो. परंतु, तिच्याकडे उत्पन्नाचे कूठलेही साधन दिसून येत नाही. याउलट, गैरअर्जदार हा महिण्याकाठी ब–यापैकी उत्पन्न मिळवत असून देखील तो हेतूपरस्पर अर्जदारांचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे त्यामुळे मी **मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो**. सदर अर्जाच्या माध्यमातून अर्जदार क्र.१ हीने तिच्याकरीता दरमहा ६,०००/– रूपये व अर्जदार क्र.२ याच्याकरीता दरमहा ४,०००/– रूपये अशी अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु, उपलब्ध कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे मागितलेली संपूर्ण रक्कम या घडीला मंजूर करणे योग्य ठरणार नाही. परंतु, दोन्ही पक्षकारांच्या जीवनस्थराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मंजूर करणे योग्य होईल. त्यामुळे मी **मूद्दा क्र.२** चे उत्तर तसे नोंदवून **मुद्दा क्र.३** च्या उत्तरादाखल पूढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजूर.
२. गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रू. ३,०००/–व अर्जदार क्र.२ याला दरमहा रू.२,०००/– असे एकूण रू.५०००/– दरमहा अंतरिम पोटगी अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

RAJKIRAN UTTAMRAO INGLE

Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2024.06.15 17:51:18 +0530

दिनांकः १५/०६/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
अंबड

**आदेशाची प्रत विनामूल्य प्राप्त झाली.**

-------------------
अर्जदार

-------------------
गैरअर्जदार

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर निवेदन करते की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस.एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
पी.डी.एफ.दिनांक :- १५/०६/२०२४

स्वा/-
लघुलेखक